# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

## परिपत्रक

**विषय : विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील पीएच्.डी. विद्यार्थ्यांना येणाऱ्या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी/समस्यांबाबत मा. अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय शिबीर आयोजित करून समस्यांचे निराकरण करणेसाठी माहिती भरणेबाबत.....**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थ्यांना प्रवेश, संशोधक विद्यार्थ्यांना सेवानिवृत्त/राजीनामा, इ. कारणामुळे संशोधन मार्गदर्शक उपलब्ध नसणे, संशोधन कार्यपद्धती, पीएच्.डी ट्रॅकिंगमधील तांत्रिक समस्या, कोर्सवर्क, शुल्क यासारख्या अडचणीं निरसित करण्यासाठी मा. अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली माहे मे, २०२६ च्या पहिल्या १५ दिवसांमध्ये जिल्हानिहाय शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख/मा.प्राचार्य/संचालक, सर्व विद्यापीठ विभाग/सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, सदर शिबीर आयोजनाकरिता आपल्या संशोधन केंद्रामध्ये विद्यार्थ्यांच्या ज्या काही अडीअडचणी/समस्या असतील, त्याची माहिती आपल्या संशोधन केंद्राच्या लॉगीनमधून Research Student Grievance Redressal System या टॅबवर दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत भरावी. जेणेकरून शिबीरामध्ये संबंधित मा. अधिष्ठाता, अधिकारी यांना कार्यवाही करणे सोयीस्कर होईल.

तद्नंतर प्राप्त अडचणी/समस्या विचारात घेऊन जिल्हानिहाय व संशोधन केंद्र निहाय वेळापत्रक व ठिकाण कळविण्यात येईल. सदरील शिबीराचे वेळापत्रकानुसार संबंधित संशोधन केंद्रातील संशोधन केंद्रप्रमुख व प्राधिकृत केंद्र समन्वयक यांनी शिबीराच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच संशोधन केंद्रामार्फत संशोधन मार्गदर्शक किंवा संशोधक विद्यार्थ्यांना शिबीराच्या ठिकाणी पाठवू नये.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/२१०१ )
दिनांक : २५.०४.२०२६ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य/संचालक, मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे, प्रस्तुत विद्यापीठ.

} आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय आपल्या विभाग/महाविद्यालय/परिसंस्थेत कार्यरत संशोधन मार्गदर्शक यांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि त्यांचेकडील पीएच्.डी. साठी नोंदणीकृत ज्या विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी/समस्या आहेत त्याची त्यांचेकडून माहिती घेऊन ऑनलाईन पद्धतीने सादर करावी.